Educational Tour.
Rasashastra B.K.

CIN NO. U24239PN2000PTC015557

SG Phyto Pharma Pvt ltd

Factory :
B-53/D-21 M.I.D.C.
Gokul Shirgaon,
Kolhapur 416 237
Maharashtra, India

Fact. B-53 :
Tele Fax : 0231 - 2672528
Mobile : +91 7875444014
Fact D-21 : 0231 2671454
Mobile : +91 7875444012

Date: 17.12.2019

To,
Principal
Vasantdada Patil Ayurvedic Medical College & Institute of Yoga
Sangli

Sub: Industrial visit

Ref.: your request letter no.595/2019-20 dt. 11.12.2019

Dear Sir,

This is to certify that 41 students of your college along with 2 staff members have visited our Factory on Tuesday 17.12.2019 - D-21 Unit.

Regards

17/12/19

Mr. Avinash Khatavkar
AGM Works
S. G. Phyto Pharma Pvt. Ltd.
Kolhapur

CIN NO.:U24239PN2000PTC015557

SG Phyto Pharma Pvt ltd

Factory :
B-53/D - 21 M.I.D.C.
Gokul Shirgaon,
Kolhapur 416 237
Maharashtra, India

Fact. B-53 :
Tele Fax : 0231 - 2672528
Mobile : +91 7875444014
Fact D-21 : 0231 2671454
Mobile : +91 7875444012

To,
Principal
Vasantdada Patil Ayurvedic Medical College & Institute of Yoga
Sangli

Date: 17.12.2019

Sub: Industrial visit

Ref.: your request letter no.595/2019-20 dt. 11.12.2019

Dear Sir,

This is to certify that 41 students of your college along with 2 staff members have visited our Factory on Tuesday 17.12.2019
Unit-B-53

Regards

MGune
17/12/19

SG PHYTO PHARMA PVT. LTD. KOLHAPUR

Mrs. Madhura M. Gune
Unit Head B-53
S. G. Phyto Pharma Pvt. Ltd.
Kolhapur


Regd. Office : 532/1, Nilgiri Apartment, Plot No. 3, Rajendranagar Ring Road, Kolhapur 416 004. MS. India 0231 - 2691520 Fax : 0231 - 2691665 Mobile : +91 7875444011
Email : sgphyto@gmail.com info@sgphyto.com Website : www.sgphyto.com



B-53


REDMI NOTE 7 PRO
AI DUAL CAMERA


B-53













2019/12/1




2019/12/1

Feed back form

Page No.
Date 19 | 12 | 2019

नाव - मोहन अनिल महामुने

आम्ही डॉ. वसंतदादा पाटिल आयुर्वेदीक महाविद्यालय चे 2nd yr चे विद्यार्थी शैक्षणिक सहलीसाठी मालवन या ठिकाणी गेलो होतो. पूर्ण नियोजनानुसार हि सहल 15 dec 2019 पासुन 17 dec 2019 अशी केवळ दोन दिवसाची होती.

ही ट्रीप डॉ. केळगावकर सर व डॉ. शेटे मॅडम यांच्या मार्गदर्शनि व सहवासात पार पडली त्यामुळे यांचे मनापासुन आभार करतो.

सहलीमध्ये कोकणातील अद्भूत सौंदर्याचे दर्शन झाले. सिंधुदुर्ग, विजयदुर्ग या अद्भूत किल्यांचे दर्शन तसेच डॉल्फिन पॉईंट, त्सुनामी आयलंड बोट राईड, बनाना राईड, स्कुबा डायविंग करताना खुप मज्जा आली.

समुद्राच्या लाटा येताना पाहताना तसेच त्या मध्ये खेळताना वेळ कसा गेला कळालाच नाही. नंतर SG Phytopharma ला भेट देण्यात आम्ही यशस्वी झालो. तेथे मिळालेले आयुर्वेदीक औषधी बनविण्याचे ज्ञान अतिशय मौल्यवान होते.

प्रत्येक जागी उत्तम राहण्याच्या व जेवनाची सोय होती. राहण्यासाठी हॉटेल पण छान होते. शिक्षक व सहकाऱ्यांची खुप मदत आम्हाला प्राप्त झाली.

तसे पाहिले तर प्रवास हा खुप थकवत असतो परंतु निसर्गाच्या मायेच्या छायेने थकवा जाणवलाच नाही.

या प्रकारे ही मालवन ची सहल एक जीवनाचा अविभाज्य घटक बनला आहे.

Name - Bansode Karishma Eknath

Roll No - 02

मालवण येथे गेलेली द्वितीय वर्ष BAMS मधील आमची सहल अत्यंत आनंदाची व प्रेक्षणीय झाली. अत्यंत सुखपूर्वक अशा सहलीचा सर्वांनी मनमुरादपणे आनंद घेतला. मालवण येथील समुद्रकिनाऱ्यावरील दृश्य पाहून मन भारावून गेले. सिंधुदुर्ग, विजयदुर्ग ही ऐतिहासिक ठिकाणे पाहून प्राचीन इतिहास डोळ्यांसमोर उभा राहिला. तेथे पाहिलेले वेगवेगळे points, त्यामध्ये Dolphin point, Tsunami Island, crocodile point, Tarkali beach हे अत्यंत प्रेक्षणीय होते. कुणकेश्वर येथील महादेवाचे मंदीर अत्यंत धार्मिक व स्वयंभू होते. तेथील रचना अद्भुत होत्या. समुद्राच्या किनाऱ्यावर असलेले हे मंदीर पाहून मन प्रसन्न झाले.

डॉ. केळगावकर सर आणि डॉ. शेटे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली ही trip अत्यंत आनंददायी झाली. एक वेगळाच अनुभव अनुभवयास मिळाला. मालवण, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग येथील नैसर्गिक सौंदर्य मनाला भारावून टाकणारे होते.

कोल्हापुर येथील SG phytopharma visit मुळे आम्हाला प्रत्यक्ष औषधी निर्माण प्रक्रियेविषयी माहिती मिळाली. त्यामुळे या सहलीमध्ये शैक्षणिक तसेच प्रेक्षणीय दृष्टीकोन पहावयास मिळाला. अशा प्रकारे ही २ दिवसांची सहल खूप छान प्रकारे झाली. कोकणसौंदर्य खरोखरच अद्भुत होते. या सहलीमध्ये केळगावकर सर आणि शेटे मॅडम यांनी केलेला support खूप महत्वाचा होता. त्यामुळे आमची पूर्ण trip खूप छान प्रकारे पार पडली.

# शैक्षणिक वार्षिक सहल अहवाल
## Pharmacy Visit

S. G. Phytopharma, Kolhapur

मार्गदर्शक शिक्षक : डॉ केळगांवकर सर

आम्ही द्वितीय वर्ष BAMS मधील विद्यार्थी - विद्यार्थीनींनी दिनांक 17-12-2019 रोजी कोल्हापूर येथील S.G Phytopharma B-53 आणि B-D-21 येथे डॉ. केळगांवकर सर यांच्या मार्गदर्शनाखाली भेट दिली. या भेटीदरम्यान तेथील औषधी निर्माण प्रक्रियेविषयी माहिती घेतली.

S. G. Phytopharma यांचे काम दोन वेगवेगळ्या विभागांमार्फत चालते. त्यामध्ये कच्चा माल पुरवठा करणारा विभाग आणि कच्च्या मालापासून औषधी तयार करणारा विभाग यांचा समावेश होतो. औषधी निर्माण प्रक्रियेत विविध विभागांचा समावेश होता. याकरिता अनेक सुसज्ज व आधुनिक विभाग निर्माण केले आहेत. त्यामध्ये नंतर अनेक उपविभाग होते.

1] क्वाथ निर्माण विभाग ⇒ यामध्ये विविध औषधींपासून क्वाथ निर्माण करण्यात येतो.

2] भट्टी विभाग ⇒ यामध्ये सर्व प्रकारची पुटे, वालुकायंत्र, भस्म करण्यासाठी लागणारी साधने, अग्नीच्या साहाय्याने औषधी निर्माण करण्याकरिता उपयुक्त साधने इ. चा समावेश होता. या विभागामध्ये समीरपन्नग निर्माण केले जात होते.

3] Drier section ⇒ तयार औषधीतील द्रवांशाचे शोषण होण्यासाठी या विभागामध्ये औषधी आणल्या जातात व व मशिनद्वारे द्रवांशाचे शोषण केले जाते.

4] कच्चा माल साठवण विभाग ⇒ Pharmacy मध्ये आलेला कच्चा माल साठवणे, वजन करणे, निवडून किंवा स्वच्छ करून घेणे हे कार्य या विभागामध्ये केले जात होते

5] यांत्रिक विभाग – या विभागामध्ये विविध द्रव्यांना भावना देणे, शोधन इ. क्रिया यंत्राच्या साहाय्याने सुरु होत्या. शोधनामध्ये ताम्र शोधन हे त्याठिकाणी आम्हाला पहावयास मिळाले.

औषधी Packing department मध्ये पुढीलप्रमाणे sections होते.

① Filling section ⇒ यामध्ये मशिनद्वारे चूर्णाच्या एकत्रितकरणातून गोळ्या बनवल्या जात होत्या. या गोळ्या tablet filling section मध्ये भरल्या जात होत्या. Tablet filling machine च्या साहाय्याने काम सुरु होते.

② Capsule filling section ⇒ यामध्ये मशिनद्वारे Capsule च्या आवरणामध्ये औषधी चूर्ण भरण्याचे काम केले जात होते.

③ container department ⇒ या विभागामध्ये तेलद्रव्यांचे Packing होते.

④ Quality control laboratory ⇒ निर्मित औषधांची गुणवत्ता येथे तपासली जात होती. त्यासाठी पुढील यंत्रे तेथे उपस्थित होती.

- Tablet disintegrator
- Spectrometer
- pH meter
- Mettle furnace
- Thin layer chromatography

याठिकाणी तयार होऊन Packing करून आलेल्या औषधांची साठवण Storage house मध्ये केली जात होती.

अशाप्रकारे आम्ही कोल्हापुर येथील S.G. phytopharma याठिकाणी भेट दिली. डॉ. डी. डी. केळगावकर सर यांच्याकडून आम्हाला माहिती व मार्गदर्शन मिळाले.

[signature]
विभाग प्रमुख,
रसशास्त्र भैषज्य कल्पना विभाग
व. पा. आ. मे. कॉलेज, सांगली.

Date
Page

# वार्षिक शैक्षणिक सहल अहवाल-2019-20

आम्ही द्वितीय वर्ष BAMS मधील सर्व विद्यार्थी-विद्यार्थींनी रसशास्त्र विभागाच्या शैक्षणिक सहलीसाठी दिनांक 16-12-2019 आणि दिनांक 17-12-2019 रोजी विविध ठिकाणांना भेट दिली. आम्ही दिनांक 15-12-2019 रोजी ठीक 11 वाजता वसंतदादा पाटील आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज येथुन निघालो. सकाळी मालवण येथील समुद्रकिनारा पाहून आम्ही सिंधुदुर्ग याठिकाणी गेलो. त्याठिकाणी आम्ही छत्रपती शिवाजी महाराजांचे मंदीर, महादेवाच्या पिंडीच्या आकाराप्रमाणे असणाऱ्या गोड्या पाण्याच्या विहीरी तसेच भवानी मातेचे मंदीर, अनेक किल्ल्यावरील बुरुज आणि सिंधुदुर्ग किल्ल्यावरील विशेषता म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांच्या हाताचे व पायाचे ठसे इ. आम्हाला पहावयास मिळाले.

सिंधुदुर्ग किल्ला पाहून त्यानंतर आम्ही विजयदुर्ग या ठिकाणी गेलो. त्याठिकाणी इतिहासाची महती सांगणाऱ्या अनेक गोष्टी पहावयास मिळाल्या त्यामध्ये राजदरबार, खलबतखाना, भुयारी मार्ग, 300 वर्षापुर्वीचे वडाचे झाड, तोफखाना, इ. पहावयास मिळाले. त्याठिकाणी आम्हाला वैज्ञानिक इतिहासाच्या दृष्टीकोनातून महत्वपूर्ण असे 'हेलियमचे पाळणाघर' पहावयास मिळाले. विजयदुर्ग या किल्ल्याला तिहेरी तटबंदी होत्या त्याही आम्हाला पहावयास मिळाल्या. विजयदुर्गाचा इतिहास गाईडकडून ऐकून संपूर्ण शिवाजी महाराजांचा काळ हा आमच्या डोळ्यासमोर उभा राहिला. विजयदुर्गहून आम्ही कुणकेश्वर येथील महादेवाच्या स्वयंभू मंदिरास भेट दिली. समुद्राच्या किनाऱ्यावरील हे धार्मिक स्थळ पाहून आणि तेथील अद्भूत रचना पाहून मनास समाधान मिळाले. <s>कुक</s> कुणकेश्वर येथील दर्शनानंतर आम्ही मालवण येथे मुक्कामास

classmate
Date
Page

आलो.

दिनांक 17-12-2019 रोजी सकाळी आम्ही देवबाग येथील Tarkeli Beach, Dolphin point, Tsunami Island तसेच crocodile point इ. व se australian seagulls birds पाहिले हे सर्व पाहून निसर्गाच्या सौंदर्याची प्रचिती आली. तेथून आम्ही कोल्हापुर येथील SG phytopharma येथे भेट देण्यासाठी निघालो. SG phytopharma येथे आम्हाला औषधी निर्माण प्रक्रियेविषयी माहिती मिळाली. औषधी निर्माण प्रक्रियेसाठी याठिकाणी विविध sections होते. त्यामध्ये Drier section, भट्टी विभाग, कच्चा माल साठवण विभाग इ. पहावयास मिळाले. तेथून आम्ही परत वसंतदादा पाटील आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज, सांगली याठिकाणी आलो.

अशा प्रकारे या २ दिवसांच्या Trip मध्ये शैक्षणिक, धार्मिक तसेच ऐतहासिक व प्रेक्षणीय स्थळे पहावयास मिळाली. रसशास्त्र विभाग प्रमुख डॉ. डी. डी. केळगावकर तसेच डॉ. शेटे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली ही trip यशस्वी झाली.

विभाग प्रमुख,
रसशास्त्र भैषज्य कल्पना विभाग
व. पा. आ. मे. कॉलेज, सांगली.

कु. गुल्लाचर मन्हाळ
Roll. no. 22

Page No.
Date

## Feedback

आम्ही वसंतदादा पाटील आयुर्वेदिक मेडिकल कॉलेजचे द्वितीय वर्षाचे विद्यार्थी दि. १५/१२/२०१९ रोजी शैक्षणिक सहलीकरिता मालवण - सिंधुदुर्ग येथे गेलो होतोत

ही शैक्षणिक सहल म्हणजे एक आनंददायी, अविस्मरणीय असा अनुभव होता. या दोन दिवसांच्या सहलीतीलअनुभव हे माझ्या आयुष्यातील सर्वात सुंदर व आल्हाददायी क्षण होते

या सहलीदरम्यान आम्ही पहिल्या दिवशी मालवण येथील समुद्रकीनाऱ्याचा मनसोक्त आनंद घेतला. तेथील अथांग असा समुद्र पाहून मन अगदी आनंदून गेले. आणि त्या अथांग समुद्राच्या अफाट लाटा पाहून तर त्यांच्या ताकदीचा त्यांगलाच अनुभव आला. परा एकंदरित हे सर्व मनाला तृप्ती देणारे होते, शांतता देणारे होते.

त्यानंतर आम्ही सिंधुदुर्ग किल्ला पाहण्यासाठी गेलो. तेथे गेल्यावर तेथील गाईड मुळे आम्हाला बऱ्याच ऐतिहासिक गोष्टी नव्याने उलगडल्या. तेथे आम्ही ऐतिहासिक तोफा बघितल्या. तसेच तेथील उंच उंच दगडी भिंती, तटबंदी बघून तर त्या किल्ल्याची आवाढव्यता किती आहे ते कळले. तसेच तेथे आम्ही ऐतिहासिक मंदिर देखील पाहिली. ते पाहून आम्हाला त्याकाळातील कलेचा प्रत्यय आला

त्यानंतर आम्ही दुसऱ्या दिवशी नंतर विजयदुर्ग किल्ला बघण्यासाठी गेलो. तेथे तर त्या किल्ल्याच्या तटबंदी म्हणजेच भक्कम तटबंदी बघून मी तर थक्कच झाले. तेथील 'खलबत खाना' बघून तेथील म्हणजेच त्याकालील लोकांच्या बुद्धीमत्तेचा प्रत्यय येतो. तसेच 'विजयदुर्ग' किल्यावरुन पाहिलेला 'सूर्यास्त' तर माझ्या डोळ्यांची तृप्ती करणारा होता.

Page No.
Date

त्यानंतर विजयदुर्ग किल्ला पाहिल्यानंतर आम्ही दुसऱ्या दिवशी त्सुनामी बेट, कलारकर्ली समुद्रकीनारा बघण्यासाठी गेलो होतात.
तेथे आम्ही परत एकदा समुद्राच्या, त्याच्या भव्यतेचा अनुभव घेतला. तेथे भ्रमण करुन किंवा स्थलांतर करुन येणारे पक्षी, त्यांच्या थव्यांच्या आनंददायी अशा दृश्यांचा अनुभव घेतला.

त्यानंतर सायंकाळी परततानां आम्ही 'कुनकेश्वर' येथील जागृत देवस्थानास भेट दिली. तसेच हे मंदीर देखील समुद्रकिनारी वसलेले असल्याने त्याच्या सुंदरतेत अजूनच भर पडलेली दिसून आली.

यानंतर सर्वात महत्वाचा असा या सहलीच्या शेवटचा टप्पा म्हणजे कोल्हापूर येथील (फार्मसी विझिट) Pharmacy Visit.
तेथे आम्ही वेगवेगळ्या आयुर्वेदिक औषधी निर्माण प्रक्रिया पाहिल्या. वेगवेगळी औषधी द्रव्ये, त्यांची Packaging पद्धती, साठवून ठेवण्याच्या पध्दती यांची माहिती घेतली. आम्ही भेट दिलेल्या आयुर्वेदिक फार्मसीचे नाव SG phyto pharma Pharmacy, Kolhapur असे होते. तसेच या Pharmacy मध्ये मोठ्या प्रमाणात औषधी निर्मिती कशाप्रकारे करतात त्याची माहिती घेतली.

अशा प्रकारे या दोन दिवसाच्या शैक्षणिक सहलीत आम्हाला खूप माहिती व आनंद असे दोन्ही महत्वाच्या गोष्टी मिळाल्या.

ही सहल, त्यातील मनमुराद आनंद आम्ही फक्त आणि फक्त 'केळगावकर सर' आणि शेटे मॅडम यांच्यामुळेच अनुभवु शकलो. या सहलीदरम्यान त्यांनी आम्हाला खूप Support केला आणि त्यामुळेच आम्ही या सहलीचा आनंद घेवु शकलो. त्यासाठी त्यांचे मनःपूर्वक आभार ...